**व्याकरणिक विशेष : {रीती वर्तमानकाळ}**

क्रियाव्याप्तीद्वारे क्रियेची पूर्णता, अपूर्णता, प्रगती किंवा पुनरावृत्ती दर्शविली जाते. एखादी क्रिया वर्तमानकाळात नेहमी घडत असेल किंवा वर्तमानकाळात त्या क्रियेची पुनरावृत्ती संदर्भित होत असेल तर त्यासाठी रीती वर्तमानकाळातील क्रियारूप वापरले जाते. उदाहरण : 'मी रोज कामाला जातो' या प्रमाण मराठीतील वाक्यात 'जातो' ह्या क्रियापदावरुन ही क्रिया नेहमी घडते आणि वर्तमानकाळात ह्या क्रियेची पुनरावृत्ती होते हे दिसते.

**१.0 व्याकरणिक विशेषाची नोंद**

मराठीच्या बोलींमध्ये रीती वर्तमानकाळ दर्शवण्यासाठी सर्वेक्षणात तीन प्रकारच्या संरचना आढळल्या आहेत : (१) [क्रियापद-त-लिंग,वचन,पुरुष सुसंवाद]; (२) [क्रियापद-स.वचन सुसंवाद]; (३) [क्रियापद-ता]. सापडलेल्या तिन्ही प्रकारच्या संरचनांचा भौगोलिक प्रसार व उदाहरणे पुढे दिली आहेत.

**१.१ पर्यायी रचना १ : [क्रियापद-त-लिंग,वचन,पुरुष सुसंवाद]**

रीती वर्तमानकाळ दर्शवण्यासाठी [क्रियापद-त-लिंग,वचन,पुरुष सुसंवाद] ही संरचना राज्यातील सर्वच जिल्ह्यांमध्ये आढळली.

**१.१.१ उदाहरण** (जि. रत्नागिरी, ता. रत्नागिरी, गाव मालगुंड, स्त्री३९, कुणबी, १२वी)

ती कामाला ज़ा**ते**

ti kamala ja**te**

ti kam-a-la ja-**t-e**

she work-OBL-DAT go-**IPFV-3SGF**

She goes to work.

**१.१.२ उदाहरण** (जि. ठाणे, ता. अंबरनाथ, गाव उसाटणे, पु१९, बौद्ध, एफ.वाय.बी.ए.)

मराटीच़ बोल**तो** मी जास्तं

məraṭic bol**to** mi ǰastə

məraṭi-c bol-**t-o** mi ǰastə

Marathi-EMPH speak-**IPFV-1SGM** I more

I speak in Marathi most of the time.

ह्या सामग्रीचे अधिकार क्रिएटिव्ह कॉमन्स संस्थेच्या श्रेयनिर्देशन-समवितरण ४.० ह्या परवान्याअंतर्गत मुक्त करण्यात येत आहेत. परवान्याच्या मजकुरासाठी पुढील दुवा पाहता येईल. http://creativecommons.org/licenses/by-nc-sa/4.0/.

### १.२ पर्यायी रचना २ : [क्रियापद-स.वचन सुसंवाद]

रीती वर्तमानकाळ दर्शवण्यासाठी [क्रियापद-स.वचन सुसंवाद] ही संरचना राज्यातील ५ जिल्ह्यांत आढळली. या पर्यायी रचनेच्या भौगोलिक प्रसाराचा तपशील आणि उदाहरणे पुढे दिली आहेत :

| **जिल्हा** | **तालुका व गाव** |
|---|---|
| जळगाव | जळगाव - धामणगाव, चाळीसगाव - दहिवद |
| धुळे | धुळे - सोनगीर, खेडे व खोरदड,<br>शिरपूर - शिंगावे व बोराडी, साक्री - धाडणे |
| नंदुरबार | नंदुरबार - घोटाणे, नवापूर - खांडबारा व चिंचपाडा, शहादा - प्रकाशा व शहादा |
| नाशिक | सटाणा - दरेगाव, मालेगाव - कळवाडी व कौळाणे (गा.) |
| पालघर | डहाणू - वेती |

**१.२.१ उदाहरण** (जि. नंदुरबार, ता. नंदुरबार, गाव धानोरा, पु४२, मातंग, ६वी)

एक पोऱ्या धाविले शाळामा ज़ा**स**

ek porya d$^{h}$awile šaḷama ja**s**

ek porya d$^{h}$awi-le šaḷa-ma ja-**s**

one son.OBL tenth-LOC school-LOC go-**IPFV.SG**

One of my sons goes to class 10 in school.

**१.२.२ उदाहरण** (जि. धुळे, ता. धुळे, गाव खोरदड, पु६८, कुणबी-पाटील, ८वी)

ते बी आयरानिमास बोल**तस**

te bi ayranimas bol**təs**

te bi ayrani-ma-s bol**təs**

they PRT Ahirani-LOC-EMPH speak-**IPFV.PL**

They too speak in Ahirani.

### १.३ पर्यायी रचना ३ : [क्रियापद-ता]

रीती वर्तमानकाळ दर्शवण्यासाठी [क्रियापद-ता] ही संरचना राज्यातील ३ जिल्ह्यांत आढळली. या पर्यायी रचनेच्या भौगोलिक प्रसाराचा तपशील आणि उदाहरणे पुढे दिली आहेत :

ह्या सामग्रीचे अधिकार क्रिएटिव्ह कॉमन्स संस्थेच्या श्रेयनिर्देशन-समवितरण ४.० ह्या परवान्याअंतर्गत मुक्त करण्यात येत आहेत.
परवान्याच्या मजकुरासाठी पुढील दुवा पाहता येईल. http://creativecommons.org/licenses/by-nc-sa/4.0/.

| **जिल्हा** | **तालुका व गाव** |
|---|---|
| कोल्हापूर | चंदगड - कोदाळी |
| सिंधुदुर्ग | दोडामार्ग - आयी व माटणे, मालवण - कट्टा, देऊळवाडा व दांडी,<br>कुडाळ - मानगाव व कुडाळ, वेंगुर्ला - वेंगुर्ला,<br>देवगड - तारामुंबरी व जामसंडे, सावंतवाडी - कोलगाव व सातर्डे |
| रत्नागिरी | राजापूर - कुंभवडे |

**१.३.१ उदाहरण** (जि. सिंधुदुर्ग, ता. मालवण, गाव दांडी, पु७२, गाबीत, ३री)

आमी त्याला काय मन**ता** देवमासा

ami tyala kay mən**ta** dewmasa

ami tya-la kay mən-**ta** dewmasa

we.EXCL he.OBL-ACC what say-**IPFV** *devmasa*

We call it *devmasa*.

**१.३.२ उदाहरण** (जि. सिंधुदुर्ग, ता. कुडाळ, गाव कुडाळ, पु६०, कुंभार, अशिक्षीत)

पन आता जास्तं पीक ये**ता**

pən ata ǰastə pik ye**ta**

pən ata ǰastə pik ye-**ta**

but now more crop come-**IPFV**

Now we get more crops/we get a better harvest.

ह्या सामग्रीचे अधिकार क्रिएटिव्ह कॉमन्स संस्थेच्या श्रेयनिर्देशन-समवितरण ४.० ह्या परवान्याअंतर्गत मुक्त करण्यात येत आहेत.
परवान्याच्या मजकुरासाठी पुढील दुवा पाहता येईल. http://creativecommons.org/licenses/by-nc-sa/4.0/.